# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/१०/२०२४ (शनिवार)**

---

## अवैधरित्या जुगार खेळणा—या ५ आरोपीतांवर गुन्हा नोंद
## नागपुर ग्रामीण  नरखेड पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन नरखेड :— ०४/१०/२०२४ चे १२:०५वा नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदार कडुन माहीती मिळाली की, नरखेड ते मोहदि दळवि रोडच्या बाजुला असलेल्या हिंदु स्मशान भुमि च्या मागच्या परीसरात काही इसम अवैधरित्या ५२ तासपत्त्यावर पैशांची बाजी लावुन हार जीत चा जुगार खेळत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळावर पोहचले असाता ५ आरोपी नामे **१)सुरेंद्र भाउरावजी सोनकुसळे वय ४२वर्ष रा. वार्ड क्र ५ नरखेड २)राजेद्र रामाजी रेवतकर वय ४० वर्ष रा वार्ड क्र १४ नरखेड ३) भुषण अशोकरावजी धकीते वय३१ वर्ष रा वार्ड क्र ०५ नरखेड ४) रोषण अर्जुन वानखेडे वय २२वर्ष रा वार्ड क्र १४ नरखेड ५)हरिदास महादेवराव रेवतकर वय ५०वर्ष रा वार्ड क्र १४ नरखेड मिळुन आले )आरोपी क्र १चे अंगझडतीत नगदी २८०० रू ,२) आरोपी क्र २चे अंगझडतीत नगदी ३२००रू ३) आरोपी क्र ३चे अंगझडतीत नगदी ४२००रू ,४) आरोपी क्र ४चे अंगझडतीत नगदी २१००रू,५) आरोपी क्र ५चे अंगझडतीत नगदी १२००रू,६) ३तास पत्ते कॅट की.१५०रू, ७)एक लाल पांढऱ्या रंगाचे पटटे असलेली ताडपतरी १० फुट लांब ४ फुट रूंद की. ५००रू असा एकुण १६१५०रू चा माल घटनास्थळा वरून जप्त करण्यात आला आहे.** वरील नमुद ५ आरोपीतां **विरूध्द पोस्टे नरखेड येथे** कलम १२ महा.जुगार प्रतिबंध अधि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास नरखेड पोलीस करत आहेत.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,श्री बापु रोहोम उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नरखेड चे ठाणेदार श्री सपोनि अजीत कदम पोउपनि देविदास ठमके, पोन रेवतकर,पोलीस अंमलदार गणेश ताजणे, जालींदर राठोडा यांनी पार पाडली.

## अवैध जनावरांची वाहतुन करणा—या आरोपीतांवर गुन्हा नोंद

## नागपुर ग्रामीण मौदा पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन मौदा :— दिनांक ०५/१०/२४ ते वेळ ००/१५ वाजता मौदा पोलीस पेट्रोलींग करत असातांना पोलीसांना गुप्त बातमीदारा कडुन माहीती मिळाली की रामटेक कडुन नवेगाव रेल्वे कडे आयशर क्र एम एच ४० सी.टी ०५७१ या वहानामध्ये अवैधरित्या जनावरे भरून कत्तलीकरिता वाहतुक केली जात आहे.मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी नाकाबंदी केली असता नवेगाव रेल्वे येथील रेल्वे रूळाजवळ एक आयशर क्र एम एच ४० सी.टी ०५७१ वाहन दिसुन आल्याने पोलीसांनी त्या वाहन चालकास थांबण्यास इशारा केला असता आयशर चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन रोडच्या बाजुला लावुन पोलीसांना पाहुन झाडा झुडपात पळुन गेला. आयशर क्र एम एच ४० सी.टी ०५७१ याची पंचासमक्ष पाहणी केली असता सदर वाहनाचे मगील डाल्याला लाकडी पाटयांनी केलेले होते. लाकडी पाटया काढुन बघितले असता मागच्या डाल्यात **१) एक लाल भु—या रंगाचा बैला किंमती ३०,०००/— रूपये ,२) दोन भु—या रंगाचे बैल प्रत्येकी किंमती ३०,००० /— रूपये ,३) पाच पांढ—या रंगाचे गोवंश जातीचे बैल प्रत्येकी किंमती ३०,०००/— असे मिळुन आले चारापाण्याची कोणतीही सोय न करता निदर्यतेने भरून नेताना मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष एकुण ८ बैल किंमती २४०,००० /— रूपये आणि आयशर क्र एम एच ४० सी.टी ०५७१ किंमती २,०००,००० /— असा एकुण मुददेमाल २,२४०,०००/— रूपयें चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.** मिळुन आलेल्या सर्व जनावरांच्या देखभालीकरीता जनावरांना गोशाळा खरबी जिल्हा भंडारा येथे दाखल केलेले आहे.

आयशर क्र एम एच ४० सी.टी ०५७१ चा फरार चालक या आरोपीच्या **विरूध्द पोस्टे मौदा येथे** कलम 11 (1) (d),11 (1) (e), 11 (1) (f) प्रा.छ.प्र.अ 5 a (1), 9 **अन्वय गुन्हा** नोंद करण्यात आलेला आहे. तसेच पुढील तपास मौदा पोलीस करत आहेत.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग ,पोलीस स्टेशन मौदा चे ठाणेदार वरीष्ठ पोलीस निरीक्षक मा. श्री. प्रमोद घोंगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दोनोडे, पोहवा संदीप नागोसे, पोलीस अंमलदार शिवाजी दिंडे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

## पोलीस स्टेशन जलालखेडा हददीतील सराईत गुन्हेगारला ६ महीने करीता हदद पार

पोलीस स्टेशन जलाल खेडा :— मौजा थुगावदेव (देवग्राम) येथील सराईत गुन्हेगार नामे पिंटु उर्फ चिंटु उत्तमराव सोनुले वय २६ वर्षे ,रा देवग्राम ता नरखेड जि नागपुर यांचे वर यापुर्वी शरीराविरूध्द तसेच इतर असे एकुण ८गुन्हे दाखल असुन त्याचे वर विविध कलमांन्वये प्रतिबंधक कारवाई करून सुध्दा त्याचे वर त्याचा काहीही परीणाम झाला नाही. तो प्रतिबंध कारवाई ला सुध्दा जुमानत नसल्याने त्याचेवर गंभीर दखल घेवुन सराईत गुन्हेगार नामे पिंटु उर्फ चिंटु उत्तमराव सोनुले वय २६ वर्षे ,रा देवग्राम ता नरखेड जि नागपुर याचे वृत्तीस आळा बसावा या करीता मा उपविभागिय दंडाधिकारी साहेब काटोल यांना सदर सराईत गुन्हेगार हा धोकादायक व्यक्ती असल्याचे खात्री झाल्याने तसेच नवरात्री उत्सव सुरू असुन व विधानसभा निवडणुक ची आदर्श आचार संहीता लागु होण्याची शक्यता असल्याने त्याास ६ महीनेकरीता नागपुर जिल्हयातुन हददपार करून त्यास अमरावती जिल्हयातील वरूड येथे त्याचे नातेवाईका कडे नेवुन सोडण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,श्री बापु रोहोम उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग यांचे मार्गदर्शनाखाली जलालखेडा ठाणेदार श्री तुषार चव्हाण सपोनि, सफौ पुरूषोत्तम धोंडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर